संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# म्हैस आणि अतिमहत्त्वाचे ठिकाण

आपला देश विकसनशील आहे आणि तो हळूहळू विकसित होतो. आतापर्यंत देशातली विमानतळे ही इतकी मोकळी असायची की तेथे सहजपणे कोणीही घुसू शकत होते. मध्यंतरी याच विमानतळांच्या आजूबाजूच्या अस्वच्छतेने एक वेगळाच धोका निर्माण केला होता. अस्वच्छतेमुळे विमानतळाच्या परिसरात अनेक प्रकारचे पक्षी गर्द करत असत. आणि त्या पक्षांची धडक लागत असून विमानांनाच धोका पोहचत असे. यामुळे काही विमाने अपघातग्रस्तही होत असत. आता विमानतळांचे आधुनिकीकरण केले जाते. प्रचंड पैसा खर्च करून विमानतळांची सुरक्षितता जपली जाते. पण ही विमानतळे कितपत सुरक्षित आहेत याची कोणीही हमी देऊ शकत नाही. कारण काही दिवसांपूर्वी सुरत इथल्या विमानतळाच्या धावपट्टीवर चक्क एक म्हैस घुसली आणि जवळपास १६७ प्रवासी घेऊन जाणाऱ्या विमानाचा मोठा अपघात टळला. आता विमानतळांच्या धावपट्ट्यांवर पक्षांपाठोपाठ जनावरेदेखील झोपू लागली तर मोठा बाका प्रसंगच निर्माण व्हायचा. विमानतळाच्या धावपट्टीवर एखादी म्हैस डुलतडुलत चालते आहे आणि ती पाहून वैमानिकाची प्रचंड धावपळ होत आहे, हे सगळे चित्र जितके गंभीर तितकेच हास्यास्पद आहे हे वृत्त वाचून अनेकांना हसू आले.आणि वाईटही वाटले. आपल्या देशाची काय अवस्था आहे. हे पाहून खेद वाटला.वेगवेगळ्या महामार्गांवर जनावरांचे जथ्थेच्या जथ्थे ठिय्या मारून बसलेले असतात. ते एकवेळ आपण समजू शकतो. परंतु विमानतळावरच एखादी म्हैस घुसावी आणि तिने सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण करावेत, हे विचार करण्यासारखेच आहे. विमानतळावरचा हा म्हशीचा प्रवेश म्हणजे आपल्या देशाच्या महत्त्वाच्या ठिकाणांबाबत अजूनही योग्य ती सुरक्षितता राखली जात नाही. यावर सहजपणे प्रकाश पडतो.एरवी विमानतळावर किंवा अगदी थेट विमानांमध्ये उंदीर आणि घुशी असण्याचे प्रकार घडतात. परंतु म्हशीसारख्या प्राण्याने थेट धावपट्टीवर धाव घ्यावी यामध्ये म्हशीने कशी मजल मारली हे तर दिसून येते. पण आपल्या महत्त्वाच्या ठिकाणांबाबत यंत्रणा जागरूक नाही हे पाहून आपणही खजील होतो.

### अगं अगं म्हशी ...

तसे पाहिले तर गाय काय किंवा म्हॅस काय ही तशी अतिशय सोशिक आणि सर्वाधिक उपयोगी पडणारी जनावरे मानली जातात. आता हेच बघाना म्हशीने विमानतळासारख्या अतिमहत्त्वाच्या ठिकाणी आपली स्वारी घुसवून आपणही कसे महत्त्वाचे ठरू शकतो हेच दाखवून दिले. मात्र याच गायींचा म्हशींचा शेळ्या मेंढ्याचा जसा रोजच्या हमरस्त्यावर जेव्हा ठिय्या बसतो तेव्हा त्यांचा उपद्रव लक्षात येतो. म्हैस जनावरही तिच्या उपद्रवीपणाबद्दल अत्यंत बेभरोशाचे आहे. कदाचित म्हणूनच, भरोशाच्या म्हशीला टोणगा अशी म्हण वापरात आली असावी किंवा म्हशीवर अवलंबून राहिल्यानंतर तिच्या मागेमागे जावे लागते आणि मग अगं अगं म्हशी मला कुठे नेशी असे म्हणण्याची वेळ येते. म्हैस पाळणाऱ्यांना या म्हशीच्या रक्षणांची सवय असते. मोठ्या उत्साहाने नदीवर आंघोळ झाली की नेलेली म्हैस जी काही पाण्यात फतकल मारून बसते ती उठायचे नावच घेत नाही. ती केव्हा उठेल हे सांगता येत नसल्याने एखाद्या अर्धवट गोष्टीचे वर्णन करताना म्हैस अजून पाण्यात आहे असे म्हणण्याचा प्रघात पडला. एक छोटीशी घटना घडते आणि ती कितीतरी गोष्टींना सहजपणे महत्वप्राप्त करून देते. एरवी दुधासाठी म्हशीचा उपयोग सर्वांना माहिती आहे. तर ती असाही उपद्रव देऊ शकते हे पहिल्यांदाज अनेकांना कळले असावे. दूध हे अत्यावश्यक असते.त्यासाठी म्हशीचा प्रत्येकवेळी विचार करण्याची गरज भासत नाही. दूध मिळाले की काम संपले. पण आता जेव्हा हीच म्हैस विमानतळावर घुसते तेव्हा तिच्याशी संबंधित अनेक गोष्टी लक्षात येऊ लागतात.काही का असेना विमान जेवढे महत्त्वाचे तेवढी म्हैसदेखील महत्त्वाची आहे. हे या निमित्ताने अनेकांच्याही लक्षात आले. अगं अगं म्हशी मला कुठे नेशी, असे म्हणता-म्हणता या म्हशीने अनेकांना आपल्यासोबत विमानतळावर नेण्याचे काम केले. आणि काही काळ विनोदी वातावरणही निर्माण केले. ही घटना जर चिं.वि.जोशी किंवा पु.ल.देशपांडे यांच्यासमोर जर हा प्रकार घडला असता तर विनोदाचे नवे स्वरुप अनुभवायला मिळाले असते.

### मुंगी आणि म्हैस

अर्थात यापूर्वीच पु.लंनी म्हैस हे प्रकरण हाताळले आहे. त्यांची ध्वनीमुद्रिकाही प्रसिध्द आहे. या सगळ्या प्रकारावरून सहजपणाने असे म्हणता येते की समाजजीवनामध्ये वेगवेगळ्या घटना घडतात. त्यामध्ये जितका गंभीरपणा दडलेला असतो, तितकाच विनोदीपणाही असतो. आता आपला देश महासत्ता होण्याची ग्वाही देत आहे. त्याला जगाच्याबरोबर स्पर्धा करायची आहे. त्याला तिथल्या सगळ्या गोष्टींचा अनुभव म्हणून उपयोग होईल. मोठमोठी अवाढव्य विमानतळे बांधताना तिथे म्हशीला शिरकाव करता येणार नाही याचीदेखील काळजी घ्यावी लागेल. आपल्याला सगळ्याच गोष्टी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हव्या असतात. परंतु त्यापूर्वी आपला राष्ट्रीय दर्जा नक्की करावा लागेल.आपल्या देशातल्या विमानतळांवर अशा पध्दतीने म्हशींना गुप्त प्रवेश असेल तर तो आपला राष्ट्रीय दर्जा समजायचा का.अशावेळी आंतरराष्ट्रीय विमानतळांवर जेवढा झगमगाट असेल तेवढी सुरक्षितताही महत्त्वाची मानली जाते.अनेकवेळेला आपल्या सुरक्षा यंत्रणा स्वत:ची फुशारकी दाखवत आणि मुंगीलाही प्रवेश करता येणार नाही, असे तावातावाने सांगत असतात. पण इथे तर एका म्हशीनेच प्रवेश केला. त्यामुळे मुंगीपेक्षाही म्हशीचे हे धाडस अधिक चर्चेत राहील. असो, विषय साधा असतो. पण तो महत्त्वाच्या ठिकाणांशी जेव्हा जोडला जातो. तेव्हा त्याचे गांभीर्य वाढते. म्हशीचा हा प्रयोग साधा असूनही लोकांना काही काळ हसवणारा ठरला. आम्हालाही तो तितकाच गंमतीशिर वाटल्यामुळे काही मुद्दे लिहावेसे वाटले.